# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

२६ डिसेंबर, २०२०



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7447744100 (PRO)


# मतीमंद मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीस १४ वर्ष सक्त मजुरीची शिक्षा व आर्थिक दंड

पोलीस स्टेशन मुल हद्दीत फिर्यादीच्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीस २४/१२/२०२० रोजी **मा. स.ज. अंसारी जिल्हा सत्र न्यायाधीश क्र. १ चंद्रपुर** यांनी १४ वर्ष सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली आहे.

हकीकत याप्रमाणे आहे की, यातील फिर्यादीची मुलगी ही मतीमंद असुन ती घरी एकटीच राहत असल्याने तीचे मंतीमंदाचा आणि एकटेपणाचा फायदा घेवुन दिनांक ०२/११/२०१६ रोजी यातील **आरोपी नामे दिलखुश एकनाथ श्रीगीरवार वय २४ रा. केळझर, ता. मुल, चंद्रपुर याने** तिचे सोबत शारीरीक संबध प्रस्थापित करून तिला गर्भधारणा केली. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मुल येथे अप.क्र. ३१६/२०१६ कलम ३७६(२)(ग)(ल)(न) भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा तपासात घेतल्यानंतर तत्कालीन तपासी अधिकारी सपोनि. मनोहर कोरेटी पोलीस स्टेशन मुल यांनी आरोपीस निष्पन्न करून आरोपीविरूध्द सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक २४/१२/२०२० रोजी **आरोपी नामे दिलखुश एकनाथ श्रीगीरवार वय २४ रा. केळझर, ता. मुल, चंद्रपुर** यास **कलम ३७६(२)(ल)(न) भांदवि मध्ये १४ वर्ष सक्त मजुरीची शिक्षा व २,०००/—रू दंड, दंड न भरल्यास ०१ वर्ष कारावासाची शिक्षा मा. स.ज. अंसारी जिल्हा सत्र न्यायाधीश क्र. १ चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. एस. आर. डेगावार, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन **सफौ. साईनाथ खैरे,** पोलीस स्टेशन मुल यांनी काम पाहिले.

———————————————————————————————